# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Shirpur**

**Date of Good Work done** :- **23/06/2022**

**Brief of the work done :-**

शिरपूर जैन येथील शेतकऱ्याची बैलजोडी चोरून नेणाऱ्या चोरट्यांना पो.स्टे. शिरपूर पोलिसांनी 07 तासांचे आत कौशल्यपूर्ण शोध घेत अटक केली आहे.

## शिरपूर पोलिसांची कारवाई

# बैलजोडीची चोरी; 3 चोरटे गजाआड



**शिरपूर जैन**, (वा.). येथे बैलजोडी चोरणारे तीन चोरट्यांना सात तासाच्या आत पकडून शिरपूर पोलिसांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

प्राप्त माहितीनुसार, शिरपूर येथील रहिवासी शाकीर खान वहाब खान (55) यांनी 21 जून रोजी शिरपूर पोलिस स्टेशनला फिर्याद दिली की, 19 ते 20 जूनच्या रात्रीच्यादरम्यान एकांबा रस्त्यावरील गोठ्यातील आठ बैलांपैकी दोन बैल अज्ञात व्यक्तीने चोरून नेले. सदर बैलजोडीची किंमत 45 हजार रुपये आहे. या प्रकरणी शिरपूर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला.शिरपूर पोलिसांनी सदर प्रकरण गांभीर्याने घेत तपासाची चक्रे फिरविली असता चोरी गेलेल्या बैलजोडीची गुप्त माहिती प्राप्त झाली. तातडीने ठाणेदार सुनिल वानखेडे यांनी चोरट्यांना पकडण्यासाठी सपोउपनि प्रकाश सरनाईक, पोहेकॉ राजेंद्र वानखेडे, मनोज काकडे, श्रीकृषण नागरे, विनोद घनवट यांची टीम तयार केली. दरम्यान ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात सपोउपनि प्रकाश सरनाईक, मनोज काकडे व शकील पठाण यांनी शिरपुरातीलच तीन चोरट्यांना शिताफितीने बैलजोडीसह ताब्यात घेतले. असलम छोट्या परसुवाले (25), महमद छोट्या रेघीवाले (19) व सुभान हुसेन रेघीवाले (25) रा. तिघेही शिरपूर यांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून आणखी चोरीच्या घटना उघडकीस येण्याची शक्यता ठाणेदार सुनिल वानखेडे यांनी वर्तविली आहे.